# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
# ग प्रभाग कार्यालय
# कार्यपत्रिका क्रमांक - ५
# सभावृत्तांत

दिनांक - ६/८/२०१८ वेळ - **सकाळी** ११:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **ग** प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार दि.०६/०८/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे **"ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह"** येथे आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. **मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन - सभापती**
२. मा.कदम निकीता अर्जुन
३. मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे
४. मा.पवार मनिषा प्रमोद
५. मा.अभिषेक गोविंद बारणे
६. मा.कैलास ऊर्फ बाबा भालचंद्र बारणे
७. मा.निलेश हिरामण बारणे
८. मा.सविता बाळकृष्ण खुळे
९. मा.सुनिता हेमंत तापकीर
१०. मा.संदिप काशिनाथ गाडे - स्विकृत सदस्य
११. मा.गोपाळ काशिनाथ माळेकर - स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

श्रीमती स्मिता झगडे – क्षेत्रिय अधिकारी**, श्री.आर.बी.जगताप – प्रशासन अधिकारी,**श्री.देवन्ना गट्टुवार – कार्यकारी अभियंता, स्थापत्य, श्री.रामदास तांबे - कार्यकारी अभियंता, श्री.सुपे ए के - लेखा अधिकारी, श्री.व्ही.एम.गायकवाड – मुख्य लिपिक, श्री.बाबासाहेब गलबले – कार्यकारी अभियंता (विद्युत), श्री.एस.एस.कुलकर्णी – सहा.आरोग्य अधिकारी, श्री.दिलीप धुमाळ – उप अभियंता,विद्युत, श्री ओहोळ व्ही.बी. - उपअभियंता स्थापत्य, श्री.इनामदार एस जी. – मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री.मोमीन ए. ए – कनिष्ठ अभियंता, श्रीम.सानप ए.व्ही, श्रीम.घोडके पी पी,श्री.कलाल आय के – कनिष्ठ अभियंता

स्थापत्य,श्री.गणेश राऊत,श्री.शिर्के एस व्ही,श्री.सतिष तायडे – विद्युत, श्री.कोरेवार एस बी – कनिष्ठ अभियंता (स्थापत्य),श्री.प्रविण धुमाळ – कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा(श्री.तावरे एम एम – कनिष्ठ अभियंता (नगररचना),श्री.बंडगर एस बी – जलनि:सारण,श्री.मोरमारे एस व्ही – कनिष्ठ अभियंता,पाणीपुरवठा,श्री.बी आर साबळे – उपअभियंता, पाणीपुरवठा, श्री.संदिप मो.पाडवी – कनिष्ठ अभियंता पाणीपुरवठा, श्री.मगर ए ए – क्रिडा पर्यवेक्षक,श्री.बी के तापकिर – वृक्षसंवर्धन, श्री.सरवदे - अतिक्रमण अधिक्षक इ. कर्मचारी उपस्थित होते.

-----

सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

दि. २/७/२०१८ चे मासिक सभेचा सभावृत्तांत ( कार्यक्रमपत्रिका क्र. ४ ) कायम करणेत येत आहे.

-------

**दि. ६/०८/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे मासिक सभेत खालीलप्रमाणे चर्चा झाली.**

मागील मासिक सभेत झालेल्या विषयांचा आढावा घेण्यात आला.

डांगे चौक येथील ओव्हरब्रिजच्या खाली लावणेत आलेल्या स्टीकर्स संदर्भात कारवाई करण्याचे काम हे आरोग्य विभागाकडे न देता अतिक्रमण विभागाकडे देण्यात यावे. आरोग्य विभागाकडे साफसफाई कामांचा व्याप अधिक असल्याने त्यांचेकडे असलेली आहे ती कामे वेळेत होत नाहीत.

**मा.निलेश बारणे** – पोस्ट ऑफिससाठी मान्यता देणेत यावी.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी)** – पोस्ट ऑफिसबाबत भूमि जिंदगी विभागाने प्रस्ताव सादर करावा. याबाबत मी आयुक्तांशी चर्चा करुन १ आठवडयाच्या आत माहिती देते.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष)** – पाण्या संदर्भात अनेक तक्रारी आहेत.

**श्री.रामदास तांबे (कार्यकारी अभियंता)** – पाण्याच्या तक्रारींना बरीच कारणे आहेत. अमृत योजनेअंतर्गत पुर्ण शहराच्या ६०% भागात नवीन हायड्रोलिक पाईप्स टाकणार आहोत.
सदर अभियान सर्वसाधारण लोकांपर्यंत पोचवावे यासाठी सर्वांनी सहकार्य करावे.
श्रीनगर टाकीच्या आजुबाजुचे डिझाईन झालेले आहे.

**मा.अभिषेक बारणे –** वॉर्ड क्षेत्र टाक्यांवाईज असते तर १ वॉर्ड १ JE असे करावे.

**श्री.रामदास तांबे (कार्यकारी अभियंता) –** अमृत योजनेचे काम सुरु झाल्यानंतर ब-याच तक्रारी कमी होतील.

**मा.संदिप वाघेरे –** प्रभाग क्र.२१ हा दाट लोकवस्तीचा विभाग आहे. येथील साफसफाईची कामे वेळेवर होत नाहीत. कर्मचारी संख्या अपुर्ण पडते.

**श्री.एस एस कुळकर्णी (सहा.आरोग्य अधिकारी) –** प्रभाग क्रमांक २१ पिंपरी मध्ये काम करायला आवश्यक पुरेसे कर्मचारी दिलेले आहेत.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी) –** आरोग्य विभागासंदर्भात कचरागाडी (Tata Ace) दुस-या शिफ्ट मध्ये देणेबाबत स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे. याबाबत ठेकेदाराला work order गेली असुन प्रभागाला यासंदर्भात माहिती देण्यात आलेली नाही.
ठेकेदाराचे ९६ कर्मचारी असुन मनपाचे २३६ कर्मचारी आहेत.
मनपाची कर्मचारी संख्या वाढवण्यात यावी या बाबीचा आढावा घ्यावा. ( आपल्याकडे कमीत कमी १५० कर्मचारी घेणे आवश्यक आहे.)

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) –** श्री.लोणकर – आरोग्य कार्यकारी अधिकारी यांना भेटुन योग्य ती माहिती घेण्यात येईल.

**मा.निलेश बारणे –** गैरहजर कर्मचा-यांवर काय कारवाई करण्यात आली?

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी) –** गैरहजर कर्मचा-यांवर कारवाई करणेसंदर्भात प्रशासनाला प्रस्ताव पाठविलेला आहे.

**मा.निलेश बारणे** - सदर प्रस्तावासंदर्भात निर्णय घेण्याचा अधिकार सभेला देण्यात यावा. यासंदर्भात योग्य ती माहिती द्या.

**मा.सुनिता तापकिर -** डी मार्ट समोर असलेल्या भुयारी मार्गातील सुरक्षिततेसाठी गार्ड नेमण्यात आला आहे, परंतु तो नेहमीच गैरहजर असतो. सायंकाळी शाळकरी मुले/मुली सदर मार्गाचा वापर करतात, परंतु हा मार्ग अतिशय असुरक्षित आहे. सदर मार्ग हा अतिशय अस्वच्छ व खराब असुन तो स्वच्छ करणे गरजेचे आहे. सदर भुयारी मार्गात रात्रीचे वेळी अतिशय वाईट प्रकार घडतात, याकरीता हा भुयारी मार्ग रात्रीचे वेळी बंद ठेवण्यात यावा.
(BRTS व Security बाबत कार्यवाही करावी.)

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) –** प्रभागांमधील मुख्य चौकांमध्ये तरी सीसीटीव्ही कॅमेराज लावणेत यावे.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी) –** मुख्य चौकांमध्ये सी सी टी व्ही बसविणेसंदर्भात पोलिस डिपार्टमेंटशी चर्चा करुन सुरुवातीला जागा निश्चीत करा.

**मा.सविता खुळे -** पोलिस डिपार्टमेंटचे मत घेऊन तसेच सदस्यांना भेटुन सर्व्हे करा.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) –** प्रभागामध्ये ठिकठिकाणी हातगाडया वाढलेल्या आहेत.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी) -** अतिक्रमण संदर्भात अनधिकृत फ्लेक्स बाबत काय कारवाई केली जाते याची माहिती श्री.सरवदे यांनी द्यावी.

**श्री.सरवदे (कार्यालय अधिक्षक, अतिक्रमण विभाग ) –** रोडवर बसलेले विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली आहे.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी) -** कारवाई नंतर देखील सदर ठिकाणी नियमीत सर्व्हे करणे अपेक्षित आहे.

**श्री.सरवदे (कार्यालय अधिक्षक, अतिक्रमण विभाग) –** काळेवाडी फाटा येथे कारवाई केलेली आहे.

**मा.संदिप गाडे –** संतोष मंगल कार्यालय, जुने पुरोहित, १६ नंबर बस स्टॉप येथे हातगाडया उभ्या राहतात त्यावर कारवाई करणे अपेक्षीत आहे.

**श्रीमती स्मिता झगडे ( प्रभाग अधिकारी) -** अतिक्रमण संदर्भातील त्यांची कार्यपध्दती निश्चीत झाली आहे.

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन (अध्यक्ष) –** गणपती उत्सव जवळ आलेला आहे. प्रत्येक वर्षीप्रमाणे पालिकेने ठरवुन दिलेल्या जागेत स्टॉल टाकणेस परवानगी देणेत यावी. इतरत्र कुठेही स्टॉल टाकणेस परवानगी देणेत येऊ नये. यासंदर्भात जागा तसेच परवानगी देणेसंबंधी जाहिरात लवकरात लवकर करणेत यावी. ( उदा. पिंपरीगाव, पवनेश्वर चौकाचा काही भाग इ. ठिकाणी स्टॉल टाकणेस परवानगी देणेत यावी.)

**मा.सुनिता तापकिर –** तापकिर मळा येथे पाईपलाईन टाकली नाही तसेच तेथील कॉर्नरचा राडारोडा उचलण्यात आलेला नाही.

**मा.संदिप वाघेरे –** प्रभागामध्ये डुकरांची संख्या वाढत आहे.  ताबडतोब कारवाई करावी.
कर्मचा-यांना कुत्रे व डुकरे  पकडण्यासाठीचे ट्रेनिंग देण्यात यावे.

वरीलप्रमाणे नेमुन देण्यात आलेल्या कामकाजाचा आढावा पुढील बैठकीमध्ये घेण्यात येईल असे सांगुन सर्वांचे आभार मानुन मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**अध्यक्ष**
**ग प्रभाग समिती**
**थेरगाव– ३३.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव - ३३
क्र-गक्षेका/कावि/४/६७ /२०१८
दिनांक -  २४ /०८/२०१८

**प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)**
**क्षेत्रीय कार्यालय,**
**थेरगाव – ३३**

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

२/- आपले विभागाशी संबंधित असणा-या विषयाबाबत झालेल्या
ठरावानुसार नियमाधीन कार्यवाही करणेत यावी, यासंदर्भात  वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही